# परिपत्रक

**विषय** :- प्राथमिक शिक्षकांच्या डी. टी. एड. गुणपत्रक व प्रमाणपत्र पडताळणी शुल्क वाढ.

**संदर्भ** :- १. परीपत्रक क्र. एसपीई २०००/(१३२/२०००)/साशि-१ मंत्रालय विस्तार भवन मुंबई-३२
२. कार्यकारी समिती सभा क्र. १७ दि.२६/०९/२०१६ चा ठराव क्र.३०५ .

डी. टी. एड. गुणपत्रक व प्रमाणपत्राची पडताळणी करण्याबाबतचा शासन निर्णय एसपीई २०००/(१३२/२०००)/साशि-१ मंत्रालय विस्तार भवन मुंबई ३२ दि. २ जून, २००० च्या शासन निर्णयानुसार प्राथमिक शाळांमध्ये १९९४ पासून नियुक्ती झालेल्या सर्व प्राथमिक शिक्षकांची डी. टी. एड. गुणपत्रक व प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषद, पुणे यांचेकडून पडताळणी करून घेण्यात यावे व त्यासाठी गुणपत्रक व प्रमाणपत्र पडताळणी शुल्क रू.१००/-घेण्यात येत होते.

सदर शासननिर्णयानुसार जिल्हा परीषद / नगरपरीषद / नगरपालिका / महानगर पालिका / कटकमंडळे इ.स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्राथमिक शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकसेवकाच्या नियुक्त्या त्यांच्या डी. टी. एड प्रमाणपत्राच्या व गुणपत्रीकेच्या उपरोक्त पडताळणीच्या अधिन राहून करण्यात येतात. संबंधित नियुक्ती प्राधिकरणाने / संस्थेच्या प्राधिकृत समितीने शासकीय परीक्षा मंडळाकडून पडताळणी करून घेण्यात यावी व त्यानंतरच मान्यता द्यावी असे नमूद केलेले आहे.

शासननिर्णय २ जून,२००० पासून अद्यापपर्यंत रू.१००/- गुणपत्रक व प्रमाणपत्र शुल्क घेण्यात येते होते. या कालावधीमध्ये स्टेशनरी दरामधील वाढ, पोस्टाच्या दरामध्ये वाढ व सेवा यात वाढ झालेली आहे. त्यामुळे दि. ८/११/२०१६ पासून गुणपत्रक व प्रमाणपत्र पडताळणी शुल्क रु.२००/- करण्यात येत आहे.

(सुखदेव डेरे)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे

प्रत माहितीस्तव:-

१. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-३२
२. शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, सेनापती बापट रोड, पुणे-४
३. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४

योग्य त्या कार्यवाहीस्तव :-

१. मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व जिल्हा परीषद)
२. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) (सर्व जिल्हा परीषद)
३. शिक्षण निरीक्षक मुंबई (उत्तर,दक्षिण,पश्चिम)
४. प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व)
५. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
६. प्रशासन अधिकारी सर्व नगरपलिका.